No G/5789

(इंग्रजीत टंकलिखित कार्यालयीन आदेशाचा मराठी अनुवाद)

—: कार्यालयीन आदेश :—

कार्यालयीन आदेश क्र. जी/२२३५, दिनांक २० मार्च, २००१ चे अधिक्रमण करुन प्रस्तुत कार्यालयीन आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

या व्दारे आदेश देण्यात येत आहे की, कोणत्याही न्यायालयीन प्रकरणातील कार्यालयीन त्रुटी (ऑफिस ऑब्जेक्शन)ची पूर्तता कार्यालयात तसेच संबंधित विभागातच (डिपार्टमेंटमध्येच) करण्यात यावी आणि ती सुध्दा संबंधित कारकून किंवा अधिकारी यांच्या समक्षच करण्यात यावी आणि सदर अधिकाऱ्यांनीदेखील संबंधित संचिका (फाईल) वकील, कारकून किंवा समक्ष व स्वत: पक्षकारांना देऊ नये.

तमाम वकील वर्ग आणि स्वत: (ईन-परसन) उपस्थित होणाऱ्या पक्षकारांना या व्दारे कळविण्यात येत आहे की, या कार्यालयीन त्रुटी (ऑफिस ऑब्जेक्शन)ची पूर्तता करण्यासाठी जी व्यक्ति येईल, त्या व्यक्तिच्या ओळखीविषयी खात्री पटण्याकरीता, त्या त्या विभागांव्दारे नोंदवही (रजिस्टर) ठेवण्यात येत आहे. तरी, त्यांना निदेश देण्यात येत आहे की, सदर नोंदवहीत, कार्यालयीन त्रुटींची पूर्तता करण्यासाठी, संबंधित अधिकाऱ्याकडे, आलेल्या व्यक्तिने आपल्या ओळखीविषयी खात्री पटवून देण्याकरीता आवश्यक ती माहिती नमूद करावी.

आणखी असेही सूचित करण्यात येत आहे की, एकदा का

रजिस्ट्रिमध्ये दाखल केलेले कागदपत्र, जसे की, अपील अर्ज (अपील मेमो), दावा अर्ज (प्लेंट) वगैरे, न्यायालयीन आवाराच्या बाहेर कार्यालयीन त्रुटी (ऑफिस ऑब्जेक्शन) च्या पूर्ततेकरीता नेलेले असल्यास, अशा प्रसंगी कसूरदार व्यक्तिविरुध्द कडक कारवाई करण्यात येईल आणि योग्य आदेशाकरीता प्रकरण संबंधित न्यायालयासमोर ठेवण्यात येईल.

वकील वर्ग आणि प्रकरणात स्वतः उपस्थित होणाऱ्या पक्षकारांना शेवटी सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी कोणत्याही अधिकारी/कारकून यांच्या टेबलावरील, कोणतेही कागदपत्र संबंधित अधिकारी/कारकून यांच्या परवानगीशिवाय स्वतः हाताळू नये/हात लावू नये.

सुरळीत प्रशासनाकरीता, उपरोक्त निदेशांचे पालन अत्यंत काटेकोरपणे करण्यात यावे. यांत कसूर केल्यास कसूरदार व्यक्तिंविरुध्द कडक कारवाई करण्यात येईल आणि वर नमूद केल्याप्रमाणे प्रकरण योग्य त्या आदेशाकरीता संबंधित न्यायालयासमक्ष ठेवण्यात येईल.

आदेशावरुन

उच्च न्यायालय, मूळ शाखा
मुंबई, २४ एप्रिल, २००३

स्वाक्षरी/- (डी. व्ही. सावंत)
प्रबंधक (मू. शा.)
प्रोथोनोटरी आणि सिनियर मास्टर.

OFFICE OF THE
Chief Translator and Interpreter
High Court, Bombay

EMTO2
A 08

A TRUE TRANSLATION
Kom
for Chief Translator & Interpreter
High Court, Bombay